

# 'प्रोत्साहन' थेट खात्यात जमा होण्याचे नियोजन करा : पालकमंत्री भुसे

अॅग्रोवन वृत्तसेवा

नाशिक : महात्मा जोतिराव फुले कर्जमुक्ती योजनेत नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहनपर ५० हजार रुपयांचे अनुदान देण्यात येते. प्रोत्साहन अनुदान थेट शेतकऱ्यांच्या खात्यात जमा होण्यासाठी नियोजन करण्यात यावे, अशा सूचना पालकमंत्री दादा भुसे यांनी केल्या.

जिल्हाधिकारी कार्यालयात गुरुवारी (ता. २४) महात्मा फुले कर्जमुक्ती योजना - २०१९ अंतर्गत प्रोत्साहन योजना, विद्युत विभाग व बांधकाम विभागाच्या आढावा बैठकीत भुसे बोलत होते. या वेळी खासदार हेमंत गोडसे, निवासी उपजिल्हाधिकारी भागवत डोईफोडे, जिल्हा नियोजन अधिकारी किरण जोशी, जिल्हा पुरवठा अधिकारी डॉ. अरविंद नरसीकर, विभागीय सहनिबंधक सहकारी संस्था विलास गावडे, जिल्हा उपनिबंधक डॉ. सतीष खरे, जिल्हा विशेष लेखा परीक्षक वर्ग - १ अविनाश पाटील, विद्युत विभागाचे मुख्य अभियंता दीपक कुमठेकर, अधीक्षक अभियंता ज्ञानदेव पडळकर, संजय खंदारे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधीक्षक अभियंता प्रशांत सोनवणे, कार्यकारी अभियंता उदय पालवे, सार्वजनिक बांधकाम विभाग मालेगाव कार्यकारी अभियंता शैलेश शिंदे, सार्वजनिक बांधकाम पूर्व विभाग कार्यकारी अभियंता विलास पाटील, सार्वजनिक बांधकाम उत्तर विभागाचे कार्यकारी अभियंता डी. एन. गांगुर्डे, सार्वजनिक बांधकाम विभाग कळवणचे कार्यकारी अभियंता मयूर वसावे यांच्यासह सर्व उपअभियंता उपस्थित होते.

भुसे म्हणाले, की राष्ट्रीय बँकांच्या माध्यमातून १९ हजार ४९३ तर जिल्हा बँकेच्या माध्यमातून १२ हजार ५०० शेतकऱ्यांचे प्रस्ताव प्रस्तावित करण्यात आले आहेत. २०१७-१८, १८-१९ व १९-२० या तीन वर्षांपैकी कोणत्याही दोन वर्षांत नियमित कर्जफेड करणारे शेतकरी या निकषास पात्र ठरणार आहेत. अशा पात्र शेतकऱ्यांना त्यांच्या कर्ज रकमेच्या आधारे ५० हजार रुपयांपर्यंत अनुदान दिले जाणार आहे. पहिल्या टप्प्यात राष्ट्रीय बँकांकडून ७ हजार ३४७ शेतकऱ्यांना अनुदान प्राप्त झाले असून उर्वरित शेतकऱ्यांनाही दुसऱ्या टप्प्यात रक्कम अदा करण्याबाबत पाठपुरावा करावा. जिल्हा बँकेच्या १२ हजार ५०० शेतकऱ्यांच्या प्रस्तावांची माहिती अॅपमध्ये न जुळल्यामुळे पहिल्या टप्प्यात जाऊ शकली नाही, परंतु दुसऱ्या टप्प्यात शासनाचे अॅप खुले झाल्यानंतर माहिती अपलोड करण्यात यावी, असे निर्देशही भुसे यांनी दिले.

## डिझाइन फार्मसीत 'एम. फार्मसी'ला मान्यता


K. K. Wagh Education Society's

## K. K. Wagh College of Agriculture & Allied Colleges

Survey No. 240, Saraswatinagar, Panchavati, Nashik - 03

### WANTED

The following posts are to be filled in the Agriculture & Allied Colleges run by K. K. Wagh Education Society, Nashik.

| Post | Qualification | No. of Posts |
|---|---|---|
| Assistant Professor (Plant Genetics & Breeding) | M.Sc. Agriculture (Plant Genetics & Breeding) | 01 |
| Assistant Professor (Biotech./Biochem.) | M.Sc. Biotechnology/ Biochemistry | 01 |
| Assistant Professor (Soil and Water Cons. Engg.) | Ph. D. or M.Tech. in Soil and Water Conservation Engg. | 02 |
| Assistant Professor (Food Process Technology) | M.Tech. (Food Technology)/ M.Tech. (Food Processing Engineering)/ M.Tech. (Agri Process Engineering) | 01 |
| Assistant Professor (Computer Engg.) | M. E. (Computer Engineering)/ M.Sc. (Computer Science)/ MCA | 01 |
| Assistant Professor (Plant Pathology) | M.Sc. Agriculture (Plant Pathology) | 01 |
| Lab Assistant (Food Technology) | B.Tech. (Food Technology) | 01 |
| Lab Assistant (Computer) | B.Sc. (Comp. Sci.)/ BCA/ Diploma in Comp. Engg. | 01 |
| Agri. Assistant (Agri.) | B.Sc. (Agri.) | 02 |
| Agri. Supervisor (Farm) | M.Sc./B.Sc. (Horticulture) | 01 |
| Livestock Supervisor | Diploma in Veterinary Science | 01 |
| Mali (Gardener) | Diploma in Agriculture | 01 |
| Tractor Driver (Farm) | 10th/12th pass (Should have Driving Experience & Driving Licence) | 01 |

Note : 1) **NET Qualified and Ph.D. candidates are preferred for Teaching faculties.**
2) Terms & conditions regarding appointment will be applicable as per K. K. Wagh Education Society's rules.

Interested & eligible Candidates are requested to apply along with xerox copies of documents within 8 days to **Principal, K. K. Wagh College of Food Technology, Survey No. 240, Saraswatinagar, Panchavati, Nashik-03** by post or by Email-ID careeropportunities.agri@kkwagh.edu.in

Advt. No. : 178/2022, Dtd. 24/11/2022

**Principal**


दै० अॅग्रोवन, दि. २५/११/२०२२, पान क्र० ०५.